॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ३ (प्रतिनिधी) : खान्देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी तसेच दुर्गम, ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांपर्यंत उच्च शिक्षणाची संधी पोहोचवण्याच्या दिशेने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. विद्यापीठाला विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दूरस्थ शिक्षण ब्यूरो (UGC-DEB), नवी दिल्लीकडून दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र सुरू करण्यास अधिकृत मान्यता प्राप्त झाली आहे.

या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून दूरस्थ शिक्षण पद्धतीद्वारे एम.ए. इतिहास आणि एम.ए. संरक्षण व सामरिकशास्त्र हे दोन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांना घरबसल्या पदव्युत्तर शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार या अभ्यासक्रमांची रचना करण्यात आली आहे. आर्थिक किंवा भौगोलिक अडचणींमुळे नियमित महाविद्यालयात शिक्षण घेणे शक्य नसलेले विद्यार्थी, ग्रामीण व आदिवासी भागातील युवक-युवती, गृहिणी तसेच नोकरी सांभाळून शैक्षणिक पात्रता वाढवू इच्छिणाऱ्या कार्यरत व्यावसायिकांसाठी हे अभ्यासक्रम विशेष उपयुक्त ठरणार आहेत.

या अभ्यासक्रमांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्स तसेच मल्टिपल एंट्री-एक्झिट प्रणालीची सुविधा मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक क्रेडिट्स अधिकृत डिजिटल खात्यात सुरक्षित राहतील आणि भविष्यात पुढील शिक्षण घेण्यासाठी त्यांचा उपयोग करता येईल. युजीसी च्या मान्यतेमुळे या दूरस्थ पदवीला नियमित पदवीइतकेच कायदेशीर मूल्य आणि नोकरीसाठी समान मान्यता मिळणार आहे. शिक्षण अर्धवट राहिलेल्या तसेच नोकरी करत असलेल्या नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता अर्ज, शुल्क रचना आणि अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती जाणून घेण्यासाठी इच्छुकांनी विद्यापीठाच्या ०२५७-२२५७४९५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ३ ऑगस्ट, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता



## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ३ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या समाजकार्य (एमएसडब्ल्यू) अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा (CET 2026-27) संदर्भातील सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यापीठाकडून ५ ऑगस्ट रोजीच ऑनलाइन हॉलतिकीट उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्यानंतर दि. ६ ऑगस्ट (गुरुवार) रोजी सामाईक प्रवेश परीक्षा होणार असून, सकाळी ११ ते १२ या वेळेत लेखी परीक्षा तर दुपारी १२.३० वाजल्यापासून वैयक्तिक मुलाखत घेण्यात येणार आहे. लेखी परीक्षा आणि मुलाखत या दोन्ही प्रक्रिया कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र प्रशाळा येथे पार पडणार आहेत.

प्रवेश परीक्षेचा निकाल व अंतिम गुणवत्ता यादी ६ ऑगस्ट २०२६ रोजी जाहीर केली जाणार आहे. तसेच रिक्त जागांनुसार स्पॉट ॲडमिशन प्रक्रिया ७ व ८ ऑगस्ट २०२६ रोजी राबविण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारांना संलग्न समाजकार्य महाविद्यालये, विद्यापीठाचा समाजकार्य विभाग तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आदिवासी अकादमी, नंदुरबार येथे प्रवेश घेता येणार आहे.

विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक लक्षात घेऊन विहित मुदतीत अर्ज सादर करून आवश्यक कागदपत्रांसह प्रवेश परीक्षेस उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

**बातमी क्रमांक २**

जळगाव, दि. ३ (प्रतिनिधी) : गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागात 'गुरू-शिष्य परंपरा आणि शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व' या विषयावर विशेष प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. दि. २ ऑगस्ट रोजी योगशास्त्र विभागाच्या योग हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील योगशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. सुहास पाठक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी योगशास्त्र विभागाचे प्रमुख इंजि. राजेश पाटील, डॉ. लीना चौधरी उपस्थित होते.

डॉ. सुहास पाठक यांनी भारतीय गुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करत शिक्षक हा केवळ ज्ञानदाता नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा खरा शिल्पकार असल्याचे सांगितले. प्रभावी शिक्षक होण्यासाठी तयारी सकारात्मक मानसिकता, विद्यार्थ्यांप्रती बांधिलकी, प्रभावी संवादकौशल्य, आकलन क्षमता, स्पष्टता आणि अचूकता या गुणांचा सातत्याने विकास आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात इंजि. राजेश पाटील यांनी गुरु हा विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारा दीपस्तंभ असल्याचे सांगितले. उपनिषदातील मंत्राचा संदर्भ देत गुरु आणि शिष्य यांनी समन्वयाने ज्ञानप्रकाश प्राप्त करावा, असे प्रतिपादन त्यांनी केले. एकाग्रता साधण्यासाठी भावनेचे महत्त्व अधोरेखित करत गुरूंनी दिलेली शिकवण आचरणात आणणे हीच खरी गुरुदक्षिणा असून गुरुजनांविषयी आदर आणि कृतज्ञता हीच गुरुपौर्णिमेची खरी शिकवण असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. लीना चौधरी यांनी सादर केलेल्या ओंकार प्रार्थनेने झाली. प्रास्ताविकात डॉ. गीतांजली भंगाळे यांनी योगशास्त्र विभागाची माहिती, विभागात राबविण्यात येणारे विविध अभ्यासक्रम तसेच योग-आयुर्वेद युनिटमधील उपचार पद्धतींचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लिन्ता चौधरी यांनी केले, तर डॉ. गीतांजली भंगाळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. एकनाथ नन्नवरे, माधवी तायडे, रत्नाकर सोनार आणि भगवान साळुंके यांनी सहकार्य केले.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ३ ऑगस्ट, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता